# प्रकरण दुसरे

# संदर्भ साहित्य व संशोधनाचे समालोचन

# प्रकरण दुसरे

## *संदर्भ साहित्य व संशोधनाचे समालोचन*

२.१ प्रस्तावना

२.२ संबंधित साहित्याचा अभ्यास व सामालोचन

२.३ समारोप

# प्रकरण दुसरे

## *संदर्भ साहित्य व संशोधनाचे समालोचन*

### २.१ प्रस्तावना

संशोधन विषयाच्या संबंधात जे महत्त्वपूर्ण ज्ञान विविध ग्रंथामध्ये आहे त्याचा थोडक्यात उल्लेख करणे आवश्यक असते. संशोधनास पूरक बाबींचा यात समावेश केला जातो. पुढील ज्ञानाचा शोध घेण्यासाठी संबंधित उपलब्ध साहित्याचे वाचन, मनन व नंतर लिखित स्वरुपात आढावा घेणे आवश्यक असते. त्यापैकी कोणते निष्कर्ष पूरक आहेत कोणते वेगळे आहेत याचाही आढावा घेण उपयुक्त ठरते. संशोधनासाठी योग्य दिशा निर्देशन व अचूक संशोधन यासाठी संबंधित संशोधनाच्या काळजीपूर्वक अभ्यास करण्याची गरज असते.

मुलींच्या व स्त्रियांच्या शिक्षणात येणाऱ्या समस्यांवर आधारीत संशोधनाचा अभ्यास केला. त्या अभ्यासाची नोंद खाली दिली आहे.

### २.२ संबंधित साहित्याचा अभ्यास व समालोचन

Bokil B.G. - Education of Rural Women Ph.D.Ed. Poona V. 1987

ग्रामीण स्त्रियांचे शिक्षण

उद्दिष्टे

१) मुलींचे प्राथमिक शिक्षणपूर्ण करण्यातील अडथळे आणि प्राथमिक शाळेत मुलींच्या नाव नोंदणीमध्ये येणाऱ्या घटकांचा अभ्यास करणे.

२) प्राथमिक शाळेमध्ये मुलींच्या नावनोंदणीमध्ये आणि स्थगन यामध्ये येणाऱ्या आर्थिक व सामाजिक घटकांचा अभ्यास करणे.

३) प्रौढ महिलांना शिक्षण घेण्यास प्रवृत्त करणाऱ्या घटकांचा अभ्यास करणे.

४) स्त्रीशिक्षणावर परिणाम करणाऱ्या अभ्यासक्रम, शैक्षणिक साधने, अध्यापन पध्दती, शिक्षकांचे प्रशिक्षण, मूल्यमापन या घटकांचा अभ्यास करणे.

५) स्त्री शिक्षणाच्या नियोजन व अमंलबजावणीमध्ये ग्रामीण लोकांच्या सहभागच्या पध्दतीचा अभ्यास करणे.

## कार्यपध्दती

पुण्याच्या आसपासच्या अवसरवाडी, आवर्डे, राहटवाडी ह्या गावातील १५ ते ५० वयोगटातील २२५ स्त्रीयांची निवड केली. स्त्री प्रौढ शिक्षण केंद्रासाठी हा कृती संशोधन प्रकल्प होता. संशोधकांनी स्त्रीयांना प्रौढ वर्गात सामिल होण्यासाठी प्रवृत्त व्हावे म्हणून गट चर्चा व बैठका घेतल्या.

## निष्कर्ष

१) समाजातील काही उत्पन्न गटातील मुली शिक्षणापासून वंचित होत्या. त्या कुटुंबाची शैक्षणिक पातळीही कमी होती. ह्या गटातील मुली आई वडिलांना कामात मदत करीत होत्या किंवा जगण्यासाठी काही रोजगार करीत होत्या.

२) सामान्यपणे मुली ८ - ९ वर्ष वयाच्या असतानाच शाळा सोडत होत्या व घरी किंवा शेतावर काम करीत होत्या तथापि त्यांच्या भावांचे शिक्षण चालू होते.

३) ज्या कुटुंबाचा सामाजिक आर्थिक दर्जा चांगला होता. त्या कुटुंबातील मुलींची शाळेतील नाव नोंदणी व टिकून राहण्याची स्थिती चांगली होती. त्यांचा सर्वसामान्य शैक्षणिक दर्जासुध्दा चांगला होता.

४) नमुना निवडलेल्या भागातील ज्या मुली अजिबात शिक्षण घेत नव्हत्या त्यांची कारणे अशी होती. अ) घरापासून शाळेचे अंतर ब) शारीरिक अपंगत्व क) घरच्या समस्या ड) दिवसभर श्रमाचे काम.

५) सामाजिक आर्थिक सर्वेक्षणामधून खालील माहिती मिळाली.

अ) मुलींच्या विवाहाचे वय वाढत आहे. ब) स्त्रियांनी कुटुंब नियोजन स्विकारले आहे. क) बहुसंख्य ग्रामीण स्त्रीयांचा उत्पन्नाचा मुख्य आधार शेती होता. ड) बहुसंख्य स्त्रिया शेतमजूर होत्या. इ) बहुतेक स्त्रीया गोपालन, कुक्कुटपालन असे जोडधंदे करत होत्या. त्यामुळे त्यांना आर्थिक मदत होत होती. बहुसंख्य कुटुंबातील स्त्रीया अशिक्षित होत्या. कुटुंबातील सभासद संख्या ६ ते १० होती.

६) स्त्रीयांच्या हुंड्याबद्दल, लग्नाच्या वयाबद्दल आणि इतर सामाजिक पध्दतीबद्दल असणाऱ्या त्यांच्या वृत्तीमध्ये कोणताच बदल दिसला नाही.

Dutt. N & Others - Educational Backwardness of girls in Haryana State. A project in collaboration with NCERT, SCERT, Haryana, 1982.

## उद्दिष्टे

१) निवडक जिल्ह्यातील ६-१४ वयोगटातील मुलींची विमुक्त जातीच्या मुलीसह - शैक्षणिक गळती आणि नाव नोंदणीचे प्रमाण तपासणे.

२) मुलींच्या शिक्षणासाठी सध्या असणाऱ्या सोयी आणि प्रेरणा जाणून घेणे.

३) गळतीची आणि नाव न नोंदण्याची कारणे जाणने.

४) स्थगितीमध्ये आणि नोंदणीमध्ये सुधारणा सुचविणे

## कार्यपध्दती

सिरसा जिल्ह्यातील स्त्रियांची १९ टक्के साक्षरता होती व महेंद्रगड जिल्ह्यातील स्त्रियाची साक्षरता २०.४२ टक्के होती असे दोन जिल्हे अभ्यासासाठी निवडले. सिरसा जिल्ह्यातील तीन गट आणि महेंद्रगड जिल्ह्यातील तितकेच गट मुलींच्या नोंदणी प्रमाण लक्षात घेऊन निवडले. सिरसा जिल्ह्यातील ४९ गावे व महेंद्रगड जिल्ह्यातील ५० गावे Systematic Sampling प्रमाणे निवडले. सिरसा

जिल्ह्यातील गावातून १०९२६ कुटुंबे आणि महेंद्रगड जिल्ह्यातील गावातून ९३९१ कुटुंबे निवडली. सिरसा जिल्ह्यातील १७१ शाळा आणि महेंद्रगड जिल्ह्यातील १३७ शाळा निवडल्या. सिरसा जिल्ह्यातील १५० शिक्षक आणि महेंद्रगड जिल्ह्यातील ६५ शिक्षकांची प्रश्नावली देण्यासाठी निवड केली.

१५८ शाळा सोडलेल्या मुलींची आणि महेंद्रगड जिल्ह्यातील १४२ शाळा सोडलेल्या मुलींची मुलाखत घेतली. शाळेत पाठविणाऱ्या मुलींच्या १०० पालकांची आणि शाळा मध्येच सोडणाऱ्या मुलींच्या १०२ पालकांची ६७ पालकांची जे मुलाना शाळेत पाठवित होत. पण मुलींना व मुलींनाही शाळेत पाठवित नव्हते अशा सिरसा जिल्ह्यातील पालकांची व महेंद्रगड जिल्ह्यातील १९१ पालकांची यामध्ये पहिल्या प्रकारचे ९५, दुसऱ्या प्रकारचे ५४, तिसऱ्या प्रकारेच ४३ पालकांची मुलाखत घेतली.

## निष्कर्ष

१) सिरसा जिल्ह्यातील मुलींच्या गळतीचे प्रमाण इ.६ वीच्या वर्गातील मुलींचे प्रमाण ३३.७ टक्के आणि पहिलीच्या वर्गातील मुलींची ११.६ टक्के होते. ७ वी च्या वर्गातील नापासांचे प्रमाण २३.९ टक्के, दुसरीच्या वर्गातील हे प्रमाण ४.७ टक्के होते.

महेंद्रगड जिल्ह्यातील इ. ६ वीतील मुलींच्या गळतीचे प्रमाण ३७.२ टक्के आणि पहिलीच्या मुलींचे ९.४ टक्के होते. इ. ७ वीच्या मुलींच्या नापासाचे प्रमाण २६.३ टक्के आणि दुसरीच्या मुलींच्या नापासाचे प्रमाण ५.९ टक्के होते. मुलींच्या शाळेत नाव नोंदणीचे प्रमाण अनुसुचित जातीच्या मुलामुलीचे प्रामण ४६.९ टक्के तर मुलींचे प्रमाण २३.९ टक्के व सिरसा जिल्ह्यातील सर्व मुलामुलींचे प्रमाण ४७.८८ टक्के होते.

२. सिरसा जिल्ह्यातील मुलींचे एक महाविद्यालय महेंद्रगड जिल्ह्यात ३ औदयोगिक प्रशिक्षण शाळा आणि २ शिक्षण महाविद्यालये होती. मुलींना

प्रोत्साहन म्हणून गणवेश पाठयपुस्तके, दुपारचे जेवण, शिष्यवृत्या दिल्या जात होत्या.

३. मुलींच्या गळतीची कारण - शिक्षकांचे वर्तन, जातीभेद, गरीबी, मुलींची पालकांना घरी मदत, लहान मुलांचा सांभाळ, पालकांचा विरोधी दृष्टीकोन, शाळेतील अपुऱ्या सुविधा, बालविवाह, अभ्यासात कमी गोडी, अयोग्य अभ्यासक्रम, अनारोग्य, वयातील फरक, पालकांची निरक्षरता, स्वतंत्र माध्यमिक विद्यालये नसणे.

15 - 95 NIEPA Women's Education in India A Regional Dimesion, New Delhi 1986.

उद्दिष्टे

१) स्त्रीशिक्षणाच्या बाबतीत मागासलेल्या जिल्ह्याची ओळख करणे.

कार्यपध्दती

संशोधनाचे दोन विभाग केले. पहिल्या विभागात ३१ चलांची निवड करुन त्यांच्या साह्याने प्रत्येक जिल्ह्यातील स्त्री शिक्षणाची पातळी शोधणे ते ३१ चल असे होते. साक्षरता, प्राथमिक शाळेत नाव नोंदणी, उच्च शिक्षणात नाव नोंदणी यामध्ये शहरी, ग्रामीण त्यामध्ये अनुसुचित जाती जमातीचे प्रमाण पाहिले.

दुसऱ्या विभागात प्रत्येक जिल्ह्यातील शिक्षणाच्या प्रत्येक स्तरावरील स्त्रीशिक्षणाच्या विकासाची पातळी पाहिली. १९८१ च्या जनगणनेनुसार करण्यात आला. १९७८ च्या चौथ्या आखिल भारतीय शैक्षणिक सर्व्हेवरुन प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक स्तरावरील मुलींच्या नाव नोंदणीची माहिती घेतली.

## निष्कर्ष

१) फक्त ९ जिल्ह्यातील स्त्री शिक्षणाची स्थिती उत्तम होती. ७० जिल्ह्यातील स्थिती चांगली, १३७ जिल्ह्यातील मध्यम व तेवढ्याच जिल्ह्यातील स्थिती कमी दर्जाची होती. ५९ जिल्ह्यातील स्त्रीशिक्षणाची स्थिती अतिशय कमी दर्जाची होती. यावरुन असे लक्षात आले की भारतातील कित्येक जिल्ह्यातील स्त्री शिक्षणाकडे खास लक्ष दयावे लागणार आहे.

२) राजस्थानातील जैसलमेर जिल्ह्यातील स्त्रीयांच्या साक्षरांचे प्रमाण १.६७ टक्के देशात सर्वात कमी होते. यावरुन प्रत्येक जिल्ह्यातील स्थानिक गरजा, समस्या लक्षात घेऊन स्त्री शिक्षणाकडे पाहावे लागेल.

1598 RajLaxmi R. A Study of of the social, Economic and political Aspects of the Growth of Higher Education of women in the Madras presidencey 1921-47, Ph.D. Edu. SNU 1984.

## उद्दिष्टे

मद्रास प्रदेशातील १९२१ ते १९४७ या काळातील स्त्रीयांच्या उच्च शिक्षणाची वाढ व विकासाचे परिक्षण करणे.

## कार्यपध्दती

स्त्रीयांच्या उच्च शिक्षणाबाबत संस्थेच्या शिष्यवृत्तीधारक स्त्रीयांच्या अभ्यास केला. त्याचबरोबर सामाजिक, आर्थिक घटकांचा अभ्यास करुन प्रादेशिक राजकारणातील त्यांचा सहभाग याचाही अभ्यास केला. माहिती विविध साधनाव्दारे उ.दा. वर्तनानपत्रे, मासिके, नियतकालिके, स्मरणिका, आत्मचरित्रे, भाषणे, सामाजिक सुधारणावरील लेख, वार्षिक अहवाल, शिक्षणाचे त्रिवार्षिक अहवाल,

जनगणना अहवाल, प्रशासकिय अहवाल, शासकीय आदेश आणि त्यांचे अहवाल, कार्यालयीन राज्याची व केंद्राची कागदपत्रे, संख्याशास्त्रीयश् कागदपत्रे इ.

- राय.के. - वाराणसी मधील मुलामुलींच्यासाठी एकत्र शिक्षण असलेल्या संस्थेमधील मुलींच्या समस्या, शिक्षणशास्त्र शाखा बी एच यु १९८४ एन सी आर टी अनुदानीत.

उद्दिष्टे

सहशिक्षण देणाऱ्या संस्थेतील कौमार्यावस्थेतील मुलींच्या समस्या शाधून काढणे.

- भटनागर एच - कौमार्य अवस्थेतील मुलींच्या व्यवसाय निवडींचा अभ्यास आणि त्या निवडीवर परिणाम करणाऱ्या घटकांचा अभ्यास.

मुख उद्दिष्टे अशी -

१) मुलींच्या व्यवसाय निवडी शोधणे.

२) मुलींच्या व्यवसाय निवडीवर परिणाम करणारे घटक शोधणे.

३) मुलींच्या व्यवसाय आवडी व निवडी यांच्यातील तफावतीचा अभ्यास करणे.

४) व्यवसाय निवडीमध्ये वेगवेगळया महिला विद्यार्थिनी गटामधील असणाऱ्या फरकाचा अभ्यास करणे तसेच त्यांच्या आवडीबरोबरच त्यांच्या व्यवसाय निवडीवर परिणाम करणाऱ्या घटकांचा अभ्यास करणे.

शंभर शासकीय व खाजगी संस्थाची पाहणी करुन स्त्रीयांसाठी असणाऱ्या व्यवसायांची जवळ जवळ १९९ स्त्रीयांसाठीच्या व्यवसायांची यादी केली. त्याप्रमाणे प्रायोगिक पध्दतीच्या अभ्यासावर आधारीत अशी व्यवसाय निवडीवर परिणाम करणाऱ्या घटकांचीही यादी तयार केली. जवळजवळ ११ क्षेत्रातील अभिरुची शोधिका सुध्दा तयार करुन त्या प्रमाणीत व विश्वसनीय केल्या गेल्या.

निष्कर्ष

१) व्यावसायिक निवडीवरती सर्वात जास्त परिणाम करणारा घटक म्हणजे अभिरुची आणि त्या पाठोपाठच मानवता सेवा, समाजसेवा, दरिद्री व मागासवर्गीय आजारी अकार्यक्षम अशा वेगवेगळया ठिकाणाहून घेतलेले घटक की जे स्वतःच्या एक बाबतीत समाधानी असतील आणि तरुण पिढीच्या आर्थिकबाबींमध्ये स्वतःच्या एक नमुना उभा करु शकतील.

२) फक्त १० टक्के मुली अशा निघल्या की ज्यांची व्यवसायिक अभिरुची आणि व्यावसायिक निवड सारखी निघाली.

३) शहरी आणि अर्धशहरी मुलींच्या बाबतीत त्यांच्या व्यावसायिक अभिरुची आणि व्यावसायिक निवडीमध्ये महत्त्वाचा फरक आढळला नाही.

४) आर्थिक दृष्ट्या संपन्न असलेल्या मुलींच्या बाबतीत मात्र त्यांची व्यासायिक अभिरुची आणि व्यावसायिक निवड यामध्ये अधिक तफावत दिसून आली.

१५८९ झा.पी. - चिंधवाडा मुलींचे शिक्षण संकुल, भटक्या जाती जमातीलतील संशोधन संस्था, भोपाळ याचा मुल्यपामनात्मक अभ्यास १९८७.

वरील अभ्यासाची मुख्य उद्दिष्ट्ये खालील प्रमाणे -

१. ज्या गोष्टीसाठी चिंधवाडा येथील जाती जमातीतील शिक्षण संकुल स्थापन केले गेले त्याची उद्दिष्ट्ये ठरविणे.

२. जी उद्दिष्टे ठरविली गेली ती त्या शिक्षण संकुलाने साध्य केली किंवा नाही ते शोधून काढणे.

३. जाती जमातीतील स्त्रियांच्या शिक्षणाबाबत संबंधीत किंवा भटक्या त्या शिक्षण संकुलाची जी भूमिका होती तिचे मूल्यमापन करणे.

४. त्या शिक्षण संकुलाच्या कार्यामध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी उपया योजना सुचविणे.

संबधित माहिती घेत असताना संबंधित परिसरातील प्राचार्य, शिक्षक वर्ग, वसतिगृह अधिक्षक, आजी विद्यार्थी, माजी विद्यार्थी यांच्या मुलाखती घेऊन संबंधित क्षेत्राचा वास्तविकपणा पडताळण्यासाठी या मुलाखती घेण्यात आल्या.

संशोधनाचा अभ्यास पुढील प्रमाणे -

१. मध्यप्रदेश सरकारच्या औपचारिक आणि अनौपचारिक शिक्षण विभागातर्फे कार्यवाहीनुसार मुलींचे शिक्षण संकुलापैकी आदिवासी मुली आणि स्त्रिया यांचे ही एक शिक्षण संकुल स्थापन झाले. चिंधवाडा येथे १९८० अशाच प्रकारची मुलींची शिक्षण संकुले अंबिकापूर, कुक्षी, चौकी, जगदालपूर, पुष्पराजघर या ठिकाणी स्थापन करण्यात आली आहेत. या शिक्षण संकुलाचे प्रमुख उद्दिष्टे आर्थिक दृष्ट्या दुर्बल असलेल्या आदिवासी आणि हरिजन कुटुंबातील मुलींना आणि स्त्रियांना शिक्षण आणि प्रशिक्षणाची सोय उपलब्ध करुन देणे आणि शिष्यवृत्ती, वसतिगृहाची सोय उपलब्ध करुन देणे. त्याचबरोबर आदिवासी आणि हरिजन मुलींच्या सर्वांगीण विकास करण्यासाठी प्रशिक्षणव्दारे शारीरिक शिक्षणाचे खेळ, सांस्कृतिक कार्यक्रम राबविणे यामुळे त्यांच्यात आत्मविश्वासाची भावना विकसीत होईल. त्याच्या आधारे त्यांना मुलभूत शिक्षण मिळून त्या शिक्षीका, परिचारिका, ग्रामसेविका इ. क्षेत्रात काम करु शकतील हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी व्दिकेंद्री शिक्षणपध्दतीचा वापर करणे आवश्यक आहे. उ.दा. इ. ६ ते ८ वी पासून आणि इ. ९ ते ११ वी पर्यंतच्या शिक्षणाची सोय, इ. ११ वी पर्यंत शिक्षणासाठी निवासी प्रवेश, गुणवत्तेनुसार दिला जावा. अभिजात कलेबाबत तांत्रिक आणि प्रात्यक्षिक कामाच्या माहितीची सोय करणे शेती, बागकाम, पशुपालन इ. सामान्य शिक्षणाशिवाय वरील क्षेत्रांचे शिक्षण दिले जावे. शारीरिक शिक्षणांतर्गत शारीरिक श्रमाची ओळख व्हावी.

२. १९८६ पर्यंत आदिवासी आणि हरिजन मुलींना दिल्या जाणाऱ्या शिक्षणाचे उद्दिष्टे साध्य झाले नाही. फक्त तीनच मुलींनी ६ व्या इयत्तेत प्रवेश घेतला होता. उपलब्ध निधी संबंधित संस्थेने प्राथमिक शिक्षणावर महागडया फर्निचरवर आणि अध्यापन साहित्याच्या खरेदीवर खर्च केला. परंतु प्राथमिक उद्दिष्टेच साध्य न झाल्याने आशाप्रकारची शिक्षण संकुल योजना असफल झाली.

३. या शिक्षण संकुल योजने अंतर्गत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आदिवासी आणि हरिजन मुलींना वसतिगृह योजनेत इतर जातीच्या मुलींना प्रवेश देण्यात आला.

४. विविध प्रदेशातील जिल्ह्यातील आदिवासी लोकसंख्येनुसार शिक्षण संकुलात योग्य प्रतिनिधीत्व मिळालेले नाही. दुसऱ्या आणि तिसऱ्या इयत्तेच्या मुलींसाठी प्रवेशाचे नियम शिथिल करण्यात आले.

५. शिक्षण संकुलाच्या स्थापना झाल्यापासुन ६ वर्षानंतर सुध्दा संस्था स्वतःची इमारत बांधू शकली नाही. या शिक्षण संकुलात पाण्याची आणि विजेची सोय होऊ शकली नाही. मुलींना पुस्तके आणि कपडे ठेवण्यासाठी योग्य फर्निचर उपलब्ध होऊ शकले नाही.

६. अभिजात कला, बागकाम, पशुपालन यासाठी प्रात्यक्षिक सोयी उपलब्ध नाहीत.

७. मुलींना व्यावसायिक शिक्षण देण्याबाबतची उद्दिष्टे शिक्षण संकुल काही प्रामाणात पूर्ण करु शकले असे दिसून आले. कारण त्यापैकी काही मुलींनी शिक्षण संकुलामध्ये शिलाई कामामध्ये कौशल्य प्राप्त केलेले होते.

८. वसतिगृहातील मुलींचा शैक्षणिक व भावनिक विकास हा त्या शिक्षण संकुलामध्ये स्थानिक मुलींच्या शैक्षणिक व भावनिक विकासापेक्षा तुलनेने अधिक चांगला दिसून आला.

९. शिक्षण संकुलाने शाररिक शिक्षण, सांस्कृतिक कार्यक्रम आणि आरोग्य यावर विशेष लक्ष दिल्याचे दिसून आले.

1597 Ra I.K. - Problems of girls studying in coeducational in stitutions of varanasi Region faculty of Education, BHU 1984 (NCERT Financed)

उद्दिष्टे

१) मुलामुलींचे एकत्र शिक्षण असणाऱ्या संस्थेमध्ये कौमार्यावस्थेतील मुलींना आरोग्य आणि शारीरिक विकास आर्थिक आणि राहण्यासाठीच्या अटी, नौकरी, सामाजिक आणि करमणुकीच्या कार्यक्रमासंबंधी सामाजिक मानसिक संबंध, न्यायासंबंधी नियम तत्वे मूल्ये आणि शाळेशी समायोजन कार्य, शिक्षणातील भविष्य अभ्यासक्रम आणि शैक्षणिक उपक्रम.

२) मुलींच्या वेगळया शिक्षण संस्थामध्ये (अभ्यास करित असणाऱ्या) शिकणा-या मुलींच्या समस्या शोधणे.

३) सहशिक्षण घेणा-या कौमार्यावस्थेतील मुलींचा तौलनिक अभ्यास

४) वेगळया शिक्षण संस्थामध्ये शिक्षण घेणाऱ्या व सहशिक्षण घेणाऱ्या कौमार्यावस्थेतील मुलींचा सामाजिक आर्थिक दर्जा व समायोजनात येणाऱ्या समस्या शोधणे.

५) वेगळे शिक्षण घेणाऱ्या व सहशिक्षण घेणाऱ्या कौमार्यावस्थेतील मुलींच्या सामाजिक आर्थिक स्तर व समायोजनाशी संबंधीत समस्यांचा शोध घेणे.

६) वेगळ्या शिक्षण संस्थामंधील व सहशिक्षण देणाऱ्या संस्थामधील कौमार्यावस्थेतील वेगवेगळया सामाजिक आर्थिक स्तरावरील मुलींच्या समायोजनातील समस्यांचा तौलनिक अभ्यास करणे.

७) १०१६ आणि ९१७ विद्यार्थ्यांची जे सहशिक्षण देणाऱ्या व वेगळया शिक्षण संस्थामध्ये शिक्षण घेणाऱ्या माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील निवड नमुन्याच्या रुपात करण्यात आली ती खालील पाच जिल्ह्यातून - १) वाराणसी २) गाझीपूर ३) भालिया ४) जानपूर ५) मिर्झापूर हे सर्व नमुने वेगवेगळया शहरी व ग्रामीण भागातून निवडयात आले साधनांमध्ये आर्थिक समस्यांची पडताळासूची प्रश्नावली व सामजिक आर्थिक दर्जाचा नोंद तक्ता.

निष्कर्ष

१) सहशिक्षण देणाऱ्या शाळेतील मुलींना मुख्यत्वे करुन समाजिक, पुर्ननिर्मीती, मुलांशी मैत्री, विवाह आणि आर्थिक, नौकरी, राहणीमानाच्या स्थिती या क्षेत्रातील मुख्य समस्यांना तोंड द्यावे लागले.

२) खाजगी क्षेत्रातील शिक्षण घेणाऱ्या मुली आणि नौकरी करणाऱ्या मुलीपैकी दोन मुलींना सामाजिक, पुर्ननिर्मीती मुलांशी मैत्री, विवाह, कुटुंब या क्षेत्रामध्ये अधिक समस्या आल्या आणि सामाजिक व मानसशास्त्रीय संबंधामध्ये तसेच अभ्यासक्रम, अध्यापन प्रक्रिया व नैतिक आणि धार्मिक क्षेत्रांमध्ये कमी समस्या निर्माण झाल्या.

३) खाजगी संस्थामध्ये आणि सहशिक्षण देणाऱ्या संस्थासाठी सुध्दा घर, आरोग्य, सामाजिक आणि भावनिक या सर्व ठिकाणीची एकूण तडजोड तसेच प्रत्येक क्षेत्राशी केलेली तडजोड हा एक सरासरीतून काढलेला नमुना किंवा उदाहरण.

४) खाजगी शाळांतील मुलींच्यापेक्षा सहशिक्षण देणाऱ्या संस्थामधील मुली या कुंटुंब, आरोग्य आणि शाळा तसेच भावनिक व एकूणच जुळवून घेण्याच्या दृष्टीकोनातून अधिक चांगल्या वाटल्या.

## २.३ समारोप

या प्रकरणात प्रस्तुत संशोधनाची संबंधित असलेल्या संशोधनाचा अभ्यास केला आहे. वरील संशोधनांचे समालोचन केले असता प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक, सहशिक्षण देणा-या संस्थातील खाजगी शिक्षण संस्थातील मुलींच्या शिक्षणाविषयी व समस्याविषयी माहिती मिळाली ती खालील प्रमाणे आहे.

पहिल्या संशोधनमध्ये प्राथमिक स्तरावरील स्थगण गळती बाबत संशोधन केले असून पुण्याच्या आसपासच्या अवसरवाडी, आवर्डे राहटवाडी या गावांशी ते संबंधित होते.

दुसऱ्या संशोधनात दत्त यांनी मुलींच्या शिक्षणातील मागासेलपणाची कारणे शोधली आहेत व हे संशोधन हरियाणा राज्याशी संबंधित होते. काही जिल्ह्यापुरते व ६ ते १४ वयोगटापुरते हे संशोधन मर्यादीत होते.

तिसरे संशोधन हे स्त्री शिक्षणाशी संबंधित होते व भारतातील ग्रामीण स्त्रीयांपुरते मर्यादीत होते.

चौथे संशोधन हे मुलींच्या शैक्षणिक विकासात आड येणाऱ्या समस्यासाठी होते व हे संशोधन वाराणसी शहरापुरते मर्यादीत होते.

पाचवे संशोधन भटनागर यांचे होते व या संशोधनामध्ये कौमार्य अवस्थेतील मुलींच्या व्यवसाय निवडींवर परिणाम करणाऱ्या घटकांची संबंधित होते.

सहावे संशोधन झा यांचे होते व ते चिंधवाडा जिल्ह्यातील भटक्या जाती जमातीतील मुलींच्या शिक्षण संकुलापुरते मर्यादीत होते.

सातवे संशोधन राय यांचे होते व ते सहशिक्षण देणाऱ्या संस्थामधील मुलींच्या शैक्षणिक समस्यांशी संबधित होते.

अशाप्रकारे सात संशोधनांचा अभ्यास करण्यात आला.

वरील संशोधनातून मुलींच्या शिक्षणातील समस्यांचा व त्यावरील उपया योजनांचा अभ्यास करण्यात आला. मुलींच्या शिक्षणाबाबतीत आणखी संशोधनाची आवश्यकता असल्याचे आढळते.

आत्तापर्यंत झालेल्या अभ्यासावरुन मुलींच्या शिक्षणात कोणकोणत्या अडचणी येतात? अडचणीचे स्वरुप कसे असते? त्यावर कोणती उपया योजना करता येईल या प्रश्नांचे स्पष्टीकरण व्हावे म्हणून संशांधिकेने " माध्यमिक स्तरावरील मुलींचे शिक्षण एक चिकित्सक अभ्यास" या विषयाची संशोधनासाठी निवड केली आहे.

# संदर्भ

१. बोकील, बी.जी. (१९८७) Cited by M.B. Buch (Edi), Forth Servey of Research in Education Opcit page no - 1402

२. दत्त, एन आणि इतर (१९८२) Cited by M.B. Buch(Edi), Forth Servey of Reserach in Education op cit page no - 1403

३. NIEPA, Women's Education in India (1986) Cited by M.B. Buch (Edi), Forth Servey of Research in Education op cit page on 1409

४. भटनागर, एच. (१९८४) Cited by M.B. Buch (Edi), Forth servey of Research in Education op cit page No - 1402.

५. JHA, P (1987) cited M.B. Buch (Edi), Forth Servey of Research in Education op cit page no 1405.

६. Rai, K (1984) NCERT Financed cited M.B. Buch (Edi), Forth Servey of Research in Education op cit page no 1410.